
# 13 वेळेची गोष्ट

0333CH13






© NCERT not to be republished

बाबांनी विकत घेतले नवीन कॅलेंडर,
आईने दाखवली एक मोठी चूक.
जुलै महिना बेपत्ता होता,
कुठे उडून गेला असेल हा?
काळजी नका करू, काळजी नका करू
माझ्याकडे आहे तुमच्या प्रश्नाचे उत्तर.
जुलै आणि जानेवारी जुळेच आहेत जणू,
चला, कॅलेंडरचा खेळ खेळू.



## उपक्रम

जुलै 2024 महिन्याचे कॅलेंडर तयार करा.

जुलै

| (सोमवार) | (मंगळवार) | (बुधवार) | (गुरुवार) | (शुक्रवार) | (शनिवार) | (रविवार) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

© NCERT not to be republished

जुलै महिन्याचे निरीक्षण करा आणि पुढील गोष्टी पूर्ण करा.

1. रविवारची संख्या। ______________________

2. या महिन्यातील गुरुवारी असलेल्या तारखा

   ______________________

3. 22 जुलैनंतर तीन दिवसांनी ______________ जुलै हा दिवस आहे या तारखेला हा वार आहे ______________________

4. 7 जुलैपासून 15 दिवसांसाठी शाळा बंद राहणार. शाळा कोणत्या तारखेला उघडेल

   ______________________



## चला एक्सप्लोर करूया

गेल्या दोन वर्षांची कॅलेंडर गोळा करा. दोन्ही कॅलेंडरमध्ये खालील गोष्टींचे निरीक्षण करा:

1. साम्य काय आहे? वर्षांमध्ये काय बदलत आहे? योग्य उत्तरावर बरोबरची ✓ खूण करा.

(a) महिन्यांची नावे — समान / बदल

(b) महिन्यातील दिवस — समान / बदल

(c) आठवड्यातील दिवस — समान / बदल

(d) रविवारची संख्या — समान / बदल

(e) वर्षातील आठवड्यांची संख्या — समान / बदल

| सण | तारीख महिना वर्ष | तारीख महिना वर्ष | सण | तारीख महिना वर्ष | तारीख महिना वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| दीपावली | | | मकरसंक्रांत | | |
| गणेश चतुर्थी | | | महावीर जयंती | | |
| ईद-उल-फितर | | | स्वातंत्र्य दिन | | |
| दसरा | | | गुरुपूरब | | |
| बुद्ध पौर्णिमा | | | प्रजासत्ताक दिन | | |
| नाताळ | | | तुमचा वाढदिवस | | |

एकाच तारखेला येणाऱ्या सणांभोवती वर्तुळ करा.



## उपक्रम

1. वर्षातील 12 महिन्यांची नावे लिहा.
2. 30 दिवसांपेक्षा कमी दिवस असलेले महिने ______________________
3. वर्षातील दिवसांची संख्या ______________________
4. हहेतल म्हणते की एका वर्षात 53 आठवडे असतात. ती बरोबर आहे का? होय/नाही. नसल्यास, एका वर्षात तुम्हाला किती आठवडे सापडले?

© NCERT not to be republished

## वयाची मजा

आपल्या आईशी बोला आणि खालील गोष्टी शोधा.



माझ्या आईच्या आईचे वय
जेव्हा माझ्या आईचा जन्म झाला:

____________




____________



माझ्या आईचे आजचे वय:

____________

आमचे वय किती?





माझा जन्म झाला तेव्हा माझ्या
आईच्या आईचे वय:

____________



माझ्या आईच्या आईचे
आजचे वय:

____________



माझ्या आईचे वय
जेव्हा माझा जन्म झाला:

____________

हेतलचे वय तिच्या भावाच्या वयापेक्षा दुप्पट आहे. ती तिच्या भावापेक्षा 10 वर्षांनी मोठी आहे. हेतल आणि तिच्या भावाच्या वय किती असेल ते ओळखा.



**शिक्षकांसाठी टीप :** वेगवेगळ्या लोकांचे वय शोधण्यासाठी त्यांनी वापरलेल्या पद्धतींबद्दल मुलांशी चर्चा करा.

© NCERT not to be republished

## उपक्रम

फॉर्म नंबर 5

केरळ सरकार



### जन्म प्रमाणपत्र

हे प्रमाणित करण्यात येत आहे की ही माहिती कोट्टायम पंचायतीच्या 2015 च्या नोंदवहीमध्ये असलेल्या जन्माच्या मूळ नोंदीवरून घेण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| नाम: | बिन्सी थॉमस जेकब |
| लिंग: | स्त्री |
| जन्म तारीख: | 02/05/2015 (दोन मे दोन हजार पंधरा) |
| जन्मस्थान: | कदमपुझा हॉस्पिटल |
| वडिलांचे नाव : | जेकब थरकन |
| आईचे नाव : | लारा थॉमस |
| नोंदणी दिनांक : | 02/05/2015 |
| नोंदणी क्रमांक : | 815/15 |

दिनांक 18. 05. 2015

अधिकाऱ्याची स्वक्षरी

© NCERT not to be republished

बिन्सीचा जन्म प्रमाणपत्र पाहा आणि खालील प्रश्नाचे उत्तर द्या.

1. 2/5/2015 दर्शवते की बिन्सीचा जन्म 2 (एप्रिल / मे / जून / जुलै) 2015 मध्ये झाला आहे.
2. 2 मे 2025 रोजी बिन्सीचे वय किती असेल? ______________
3. 2030 मध्ये तिचे वय किती असेल? ______________
4. बिन्सीचा आठवा वाढदिवस ______________ रोजी होता.
5. 2 ऑगस्ट 2015 रोजी बिन्सी ______________ महिन्यांची होती.
6. तिच्या जन्मानंतर किती दिवसांनी प्रमाणपत्र देण्यात आले? ______________



## उपक्रम

1. स्वत:चे जन्म प्रमाणपत्र तयार करा.

फॉर्म नंबर ____________________

सरकार ____________________

### जन्म प्रमाणपत्र

हे प्रमाणित करण्यात येत आहे की ही माहिती _____ पंचायतीच्या _____ च्या नोंदवहीमध्ये असलेल्या जन्माच्या मूळ नोंदीवरून घेण्यात आली आहे.

नाव : ____________________

लिंग: ____________________

जन्म तारीख: ____________________

जन्म स्थान: ____________________

वडिलांचे नाव : ____________________

आईचे नाव : ____________________

प्रमाणपत्र तयार करण्याची तारीख : ____________________

प्रमाणपत्र तयार करण्याच्या तारखेचे वय: ____________________

तुमची स्वाक्षरी


© NCERT not to be republished

2. खाली दिलेल्या बॉक्समध्ये तारखा लिहून खालील गोष्टी पूर्ण करा:

| जन्म तारीख | ज्या तारखेला तुम्हाला शाळेत प्रवेश देण्यात आला. | ज्या तारखेला तुम्हाला इयत्ता पहिलीत प्रवेश मिळाला होता. | ज्या तारखेला तुम्हाला तिसरीत प्रवेश मिळाला होता. |
|---|---|---|---|
| | | | |

## आपण खेळूया


एक योग्य वेळ दाखवणारे भिंतीवरील घड्याळ किंवा हातात घालायचे घड्याळ मिळवा. घड्याळाचा चेहरा आणि त्याच्या काट्यांच्या हालचालींचे निरीक्षण करा. तुम्ही काय निरीक्षण केलेत त्यावर चर्चा करा.





## उपक्रम

1. हेतलने सकाळी 7 वाजता नाश्ता करायला सुरुवात केली.तिने सकाळी 07:15 वाजता नाश्ता संपवला.

(a) 07:00




(b) 07:15




तिने नाश्ता करण्यासाठी _____ मिनिटे घेतली. तुम्ही कसे ओळखले ?

2. खाली दिलेली वेळ दर्शवण्यासाठी घड्याळावर तासाचा काटा आणि मिनिटाचा काटा काढा :

(a) 8:15 किंवा सव्वा आठ



(b) 8:30 किंवा साडेआठ



**शिक्षकांसाठी टीप :** घड्याळावरील संख्या आणि चिन्हांचा अर्थ काय आहे याबद्दल मुलांशी चर्चा करा. तसेच घड्याळ वापरुन तास आणि मिनिटांचा कालावधी मोजण्याच्या प्रक्रियेची चर्चा करा.

© NCERT not to be republished

## उपक्रम


हेतलच्या आयुष्यातील एक दिवस.

चित्रात दर्शवलेल्या विधानासोबत दिलेल्या क्रिया जुळवा. वेळ लिहा आणि जिथे आवश्यक असेल तिथे मिनिट काटा आणि तासाचा काटा काढा.




© NCERT not to be republished


# आजीच्या घराला भेट




## चला विचार करूया

तुमच्या दैनंदिन जीवनातील घटना किंवा क्रिया ज्यासाठी पुढील कालावधी लागू शकतो त्या लिहून तक्ता भरा. प्रत्येक स्तंभात एक उदाहरण दिले आहे..

| महिने लागतात | आठवडे लागतात | काही दिवस लागतात | तास लागतात | काही मिनिटे लागतात |
|---|---|---|---|---|
| उन्हाळ्यापासून हिवाळ्यात बदलणे | वर्गातील एक धडा पूर्ण करणे | स्वेटर विणणे | शर्ट शिवणे | अंघोळ करणे |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |



**शिक्षकांसाठी टीप :** मुलाचे लक्ष वेगवेगळ्या घटनांकडे वेधून घ्या ज्या पूर्ण होण्यासाठी मिनिटे, तास, दिवस किंवा महिने लागतात.

© NCERT not to be republished

3. खालील क्रियांसाठी किती मिनिटे लागतात ते लिहा..










| क्रिया: | लागलेला वेळ |
|---|---|
| शाळेचा कालावधी। | ________ मिनिटे |
| लंच ब्रेक | ________ मिनिटे |
| दुपारचे जेवण | ________ मिनिटे |
| खेळाचा कालावधी | ________ मिनिटे |
| रात्रीचे जेवण | ________ मिनिटे |
| दात घासणे | ________ मिनिटे |

4. खाली दिलेल्या कालमर्यादेत तुम्ही काय करू शकता ते लिहा.

| वेळ | क्रिया: |
|---|---|
| 5 मिनिटे | |
| 10 मिनिटे | |
| 15 मिनिटे | |
| 20 मिनिटे | |
| 25 मिनिटे | |
| 30 मिनिटे | |
| 45 मिनिटे | |
| 60 मिनिटे | |

© NCERT not to be republished

5. मिनिट आणि तासाच्या काट्यांची हालचाल पाहून किती मिनिटे होऊन गेली ते लिहा.

| सुरुवातीची वेळ | समाप्तीची वेळ | लागलेला वेळ |
|---|---|---|
|  |  | 5 मिनिटे |
|  |  | |
|  |  | |
|  |  | |
|  |  | |
|  |  | |

© NCERT not to be republished

## चला एक्सप्लोर करूया

तुम्ही विविध ठिकाणी डिजिटल घड्याळे पाहिली असतील. कुठे पाहिली आहेत ?






**डिजिटल** घड्याळ अंक वापरून वेळ दाखवते. सेकंद, मिनिट आणि तासाच्या काट्यांनी वेळ दर्शविणाऱ्या घड्याळाला **ॲनलॉग** घड्याळ म्हणतात.

1. वरील दोन घड्याळांमध्ये काय फरक आहे?
2. तुमच्या शाळेच्या भिंतीवर कोणते घड्याळ आहे?

वाळूच्या घड्याळांचा वापर करून देखील कालावधी मोजला जातो. एखाद्या प्रौढ व्यक्तीच्या उपस्थितीत, आपले स्वतःचे वाळूचे घड्याळ (टाइमर) बनवा.

**आवश्यक साहित्य :**

(i) दोन लहान आकाराच्या पारदर्शक किंवा काचेच्या टाकाऊ बाटल्या, त्यांच्या झाकणांसह.

(ii) बाटलीची झाकणे जोडण्यासाठी चांगला गम.


**प्रक्रिया :**

चांगला गम वापरून बाटलीची झाकणे एकमेकांशी जोडा.

जोडलेल्या झाकणांच्या मध्यभागी बारीक सुईने एक लहान छिद्र करा.

एक बाटली अर्ध्यापर्यंत बारीक वाळूने भरा आणि जोडलेल्या झाकणांसह बाटली बंद करा.

जोडलेल्या झाकणांच्या दुसऱ्या बाजूला दुसरी बाटली जोडा.



एका बाटलीतून दुसऱ्या बाटलीत वाळू जायला किती वेळ लागतो ते घड्याळात बघून शोधा. तुमचे वाळूचे घड्याळ वापरासाठी तयार आहे. वेगवेगळे खेळ खेळताना तुम्ही वेळ मोजण्यासाठी हे वापरू शकता.

© NCERT
not to be republished